# निशाणी क्रमांक ४० वरील आदेश

(अनुसया बळीराम थोरात **विरुध्द** बळीराम रामचंद्र थोरात, ईतर- १)

१. प्रस्तुत अर्ज वादी यांनी दाव्यात दुरुस्ती करण्याची परवानगी मिळण्यासाठी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश ६ नियम १७ अन्वये दाखल केला आहे.

२. प्रतिवादी यांनी खुलासा (नि.क्र.४०) दाखल करुन अर्जास तीव्र हरकत घेतली आहे.

३. वादीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री.ए.के.खंदारे व प्रतिवादींतर्फे जेष्ठ विधीज्ञ श्री.व्ही.आर.लाहोटी यांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी अनुक्रमे अर्ज व खुलाशाप्रमाणे युक्तीवाद सादर केला.

४. वादी यांचा अर्ज व दावा तसेच प्रतिवादींचा खुलासा व लेखी जबाब तसेच अभिलेखावरील कागदपत्रांचे बारकाईने अवलोकन केले. दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश ६ नियम १७ बारकाईने वाचले.

५. वादी यांच्या अर्जातील थोडक्यात म्हणणे की, प्रस्तुत दावा वादीने प्रतिवादींविरुध्द वाटणी करुन ताबा मिळणेबाबत दाखल केला आहे. वादीच्या दाव्याच्या परिच्छेद क्र.१ मधील मौजे शिरपुर जैन, ता. मालेगांव, जि. वाशिम येथील मालमत्ता क्र.६३ असुन टाईप मिस्टेकमुळे दाव्यामध्ये मालमत्ता क्र.६२ हा लिहिला आहे जो की चुकीचा आहे. अशा परिस्थितीत दाव्यामध्ये ज्या–ज्या ठिकाणी मालमत्ता क्र.६२ नमुद आहे त्या जागी मालमत्ता क्र.६३ अशी दुरुस्ती करणेसाठी वादीने सदरचा अर्ज केला आहे.

६. प्रतिवादी यांचे खुलाशातील थोडक्यात कथन की, प्रस्तुत प्रकरणात चौकशी सुरु झाली आहे, अर्ज कालबाह्य आहे, मुद्दे निघुन बरेच दिवस झाले आहे, वादीने नि.क्र.२६ प्रमाणे पुरावा देखील दाखल आहे व प्रस्तुत अर्जाद्वारे वादी प्रकरण लांबवीत आहे. सबब, प्रतिवादी यांनी अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

७. अभिलेखाचे बारकाईने अवलोकन केले असता, वादीने प्रतिवादींविरुध्द मौजे शिरपुर येथील मालमत्ता क्र.६२ मध्ये वाटणी करुन ताबा मिळणेसाठी प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता असेही दिसुन येते की, दाव्यात माझे विद्वान पुर्वपिठासिन अधिकारी यांनी वाद मुद्दे

निश्चित केल्यानंतर वादीने नि.क्र.२६ प्रमाणे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र व पुढील सरतपास नोंदविला आहे. मात्र अद्याप उलटतपास नोंदविण्यात आलेला नाही. तद्रनंतर वादीने प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे. याठिकाणी नमुद करण्यासारखी बाब म्हणजे वादीने नि.क्र.३३ अन्वये दावा मिळकतीचा नमुना आठ– अ चा प्रमाणित उतारा दाखल केला आहे. त्यात दावा मिळकतीचा क्र.६३ असा नमुद आहे. मात्र दाव्यात दावा मिळकतीचा क्र.६२ नमुद आहे. वादीने अर्जासोबत स्वतःचे शपथपत्र दाखल केले आहे. अशा परिस्थितीत वादी मागत असलेली नियोजित दुरुस्ती केवळ दावा मिळकतीच्या क्रमांक दुरुस्त होऊन मिळण्यासाठी असल्याने सदर दुरुस्ती तांत्रीक स्वरुपाची आहे. याठिकाणी नमुद करण्यासारखी बाब म्हणजे दावा मिळकतीच्या क्रमांक दुरुस्त केल्यास दाव्याच्या मुळ स्वरुपात कुठलाही बदल होणार नाही. नियोजित दुरुस्तीचे स्वरुप पाहता सदर दुरुस्ती वादी व प्रतिवादी यांच्यातील वादाचे गुणदोषावर निराकरण करण्यासाठी पुरक आहे. नियोजित दुरुस्ती मंजुर केल्यास दाव्याच्या मुळ स्वरुपात बदल होत नाही. त्यामुळे प्रतिवादीचे कुठलेही नुकसान होणारे नाही. केवळ वादीने नियोजित दुरुस्तीसाठी अर्ज करण्यास केलेल्या विलंबावरुन अर्ज नामंजुर करणे न्यायोचित होणार नाही. सबब, वादींचा अर्ज त्यांच्यावर खर्च लादुन मंजुर होण्यास पात्र आहे.

## –: आ दे श :–

१. वादींचा अर्ज (नि.क्र.४०) प्रतिवादींना रक्कम रु.२००/– खर्च म्हणुन देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येतो.

२. वादीस दाव्यात कायदेशीर मुदतीत नियोजित दुरुस्ती करण्यास परवानगी देण्यात येते.

**स्वा/–**

(जी.एस.बडगुजर)

दिनांकः २६/०२/२०२४. दिवाणी न्यायाधीश क.स्तर., मालेगांव.

# CERTIFICATE

**I affirm that the contents of this P.D.F file Judgment/Order are same word to word, as per the original Judgment/Order.**

| | |
|---|---|
| Name of Stenographer | Shri. C. R. Lande (Grade III) |
| Name of Court | C.J.J.D. & J.M.F.C., Malegaon, District - Washim. |
| Date of Dictation | 26/02/2024 |
| Judgment/Order signed by the PO on | 26/02/2024 |
| Judgment /Order uploaded on | 27/02/2024 |